# सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत शुश्रृषा संवर्गातील गट-क सरळसेवेच्या पदभरतीच्या जाहीर प्रकटनबाबत

सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत उपसंचालक आरोग्य सेवा (शुश्रृषा) मुंबई यांच्या राज्यस्तरीय आस्थापनेवरील शुश्रृषा संवर्गातील पाठयनिर्देशिका या संवर्गाची रिक्त पदे सरळसेवेने भरण्याबाबत दिनांक २८.०२.२०२१ रोजी घेण्यात आलेल्या परिक्षेबाबत मा.आयुक्त महोदय, आरोग्य सेवा मुंबई यांच्या मान्यतेने सुधारित गुणवत्ता यादी व सदरच्या सुधारीत यादीवरुन तयार करण्यात आलेली निवड पात्र उमेदवारांची यादी आयुक्तालयाच्या https://arogya.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर दि.११.११.२०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली होती. यानुसार दि.१६.११.२०२२ रोजी निवड झालेल्या उमेदवारांचे समुपदेशन आरोग्य सेवा आयुक्तालय, आरोग्य भवन मुंबई येथे आयोजित करण्यात आलेले होते. त्यानुसार नियुक्ती आदेश दि.०९.१२.२०२२, दि.३१.०३.२०२३ व दि.११.०७.२०२३ रोजीच्या आदेशानुसार निर्गमित करण्यात आलेले आहेत.यापुर्वी दि.२८.१२.२०२२ रोजी करण्यात आलेल्या जाहिर प्रकटनानुसार दि.०९.१२.२०२२ रोजी निर्गमित केलेल्या नियुक्ती आदेशानुसार रुजू न झालेल्या उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल असे नमूद करण्यात आलेले होते (एकूण १० उमेदवार रुजू झालेले नाहीत). तसेच दि.३१.०३.२०२३ रोजीच्या नियुक्ती आदेशानुसार एकूण ६ उमेदवार रुजू झालेले नाहीत त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे जाहिर प्रकटन करण्यात येत आहे.

**“सदर पदभरतीच्या समुपदशेनास गैरहजर असलेले व समुपदेशनाअंती अपात्र ठरलेले व नियुक्ती आदेश देऊनही रुजु न झालेलेल्या उमेदवारांची निवड या जाहीर प्रगटनाद्वारे रद्द करण्यात येत आहे याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.”**

दि.३०.११.२०२३
ठिकाण - मुंबई

स्वाक्षरी/-
उपसंचालक, (शुश्रृषा)
आरोग्य सेवा आयुक्तालय मुंबई